# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य./उच्च माध्य.गोप./ 7566
कोल्हापूर-४१६ ००४.
दिनांक :- २६.०३.२०२१

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय/माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा एप्रिल-मे २०२१ च्या प्राचार्य/मुख्याध्यापकांसाठी मार्गदर्शक सूचना.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत एप्रिल-मे २०२१ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा अंतर्गत लेखी परीक्षा दि. २९/०४/२०२१ ते दि. २०/०५/२०२१ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा अंतर्गत लेखी परीक्षा दि. २३/०४/२०२१ ते दि. २१/०५/२०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तसेच इ.१० वी प्रात्यक्षिक परीक्षा दि. २१/०५/२०२१ ते दि. १०/०६/२०२१ व इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षा दि. २२/०५/२०२१ ते दि. १०/०६/२०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत तसेच इ.१० वी च्या श्रेणी/तोंडी व इतर अंतर्गत मुल्यमापन इ. परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना देण्यात येत आहे. याशिवाय इ.१२ वी च्या विज्ञान, कला, वाणिज्य व व्यावसायिक शाखांतील विषयांची श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मुल्यमापन इ. परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात येत आहे.

उपरोक्त लेखी, प्रात्यक्षिक व तत्सम परीक्षांबाबत कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य/मुख्याध्यापक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सदर सूचना पत्रासोबत जोडण्यात येत असून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून सदर विशेष मार्गदर्शक सूचनांची काटकोर अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - प्राचार्य/मुख्याध्यापक यांच्यासाठी
विशेष मार्गदर्शक सूचना पृष्ठ १ ते २३

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा एप्रिल-मे २०२१

## मुख्याध्यापक/प्राचार्यांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना

## प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प, इ.

१. कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता बहुतांश उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह सुरू ठेवण्यास कमी कालावधी मिळाल्याने निर्धारित प्रात्यक्षिकांचा सराव करता आलेला नाही. सदर बाब विचारात घेऊन उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेतंर्गत विज्ञान/तत्सम व गणित विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे. याचा तपशील परिशिष्ट-ब मध्ये देण्यात आलेला आहे.

अ) सदर परीक्षा दि.२२/०५/२०२१ ते दि.१०/०६/२०२१ या कालावधीत आयोजित करण्यात येतील. प्रात्यक्षिक वही (जर्नल) उपरोक्त कालावधीत विद्यार्थ्यांकडून जमा करुन घेण्यात यावेत.

ब) इ.१२ वीचे विद्यार्थी भविष्यामध्ये विविध कौशल्यांवर आधारित उच्च शिक्षणासाठी प्रवेशित होणार असल्याने व कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेऊन विषयनिहाय प्रात्यक्षिकांची संख्या कमी करण्यात आलेली आहे. त्याबाबत कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहे.

२. कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर इयत्ता १२ वीची श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे घेण्यात येईल.

अ. विज्ञान, कला, वाणिज्य व व्यावसायिक शाखातील विषयांची श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात येत आहे

ब. प्रात्यक्षिक वही (जर्नल) जमा करण्याच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यास कोविड-१९ विषाणूची लागण झाली असल्यास अथवा त्रास होत असल्यास प्रात्यक्षिक वही जमा करण्यास आणखी १५ दिवसापर्यंत मुदतवाढ देण्यात येईल.

क. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा,प्रकल्प इ. परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक संबंधित कनिष्ठ महाविद्यालयातूनच देण्यात यावेत.

३. कनिष्ठ महाविद्यालयात येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

४. उपरोक्त कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर छोटी बाटली सोबत ठेवण्याबाबत तसेच स्वतःचा मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुद्धा स्वतःसोबत आणावे व त्याचाच वापर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना सूचित करावे.

५. प्रात्यक्षिक वही (जर्नल) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करताना विद्यार्थी व अन्य संबंधित घटकांकडून गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन होईल असे पहावे. विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश देताना त्यांचे तापमान घेऊन त्यांना टप्प्याटप्प्याने (बॅचेस पध्दतीने) प्रवेश देण्यात यावा. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश करताना व कनिष्ठ महाविद्यालयातील संपूर्ण कालावधीत मास्क वापरणे विद्यार्थी व सर्व घटकांना अनिवार्य राहील.

६. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सॅनिटायझरचा वापर करावा. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घ्यावी. प्रात्यक्षिक वही (जर्नल)जमा केल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्वरित शाळेचे आवार सोडावे.

७. कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवारातील कचरा कुंडया झाकून ठेवाव्यात.

८. स्वच्छतागृह वेळोवेळी निर्जतूंकीकरण करुन घ्यावीत.

९. प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षेच्या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवारामध्ये पालकांना प्रवेश देऊ नये.

१०. प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षेच्या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवाराबाहेर पालकांनी गर्दी करु नये यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी.

११. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी/पालक यांना वारंवार येणाऱ्या शंकाची (FAQ) उत्तरे राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याबाबतची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून दयावी.

------------------------****------------------------

## २ ) भौतिकशास्त्र

भौतिकशास्त्र विषयाकरिता एकूण प्रात्यक्षिकांपैकी कोणत्याही चार दीर्घ प्रात्याक्षिके (Long experiment) व कोणतीही एक कृती (Activity) पूर्ण करावी व त्यावर आधारित जर्नल प्रमाणित (certify) करावे.

वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन : प्रश्नपत्रिकेच्या आराखड्यानुसार, घेतलेल्या चार दीर्घ प्रात्याक्षिके (Long Experiment) व एक कृती (Activity) यावर आधारित परीक्षा घ्यावी.

| | |
|---|---|
| १ दीर्घ प्रयोग (Long experiment) | (१० गुण) |
| १ लघु प्रयोग (Short Experiment) (घेतलेल्या चार दीर्घ प्रयोगावर आधारित) | (५ गुण) |
| १ कृती (Activity) | (५ गुण) |
| प्रमाणित जर्नल (Certified Journal) | (५ गुण) |
| मौखिक परीक्षा (viva) | (५ गुण) |
| | एकूण ३० गुण |

## ३) जीवशास्त्र

जीवशास्त्र (५६) विषयाकरिता एकूण प्रात्यक्षिकांपैकी खालील प्रमाणे प्रात्याक्षिके पूर्ण करावे व त्यावर आधारित प्रयोग वही प्रमाणित (certify) करावी.

प्रश्नपत्रिकेच्या खालील आराखड्यानुसार परीक्षा घ्यावी.

A. मुख्य प्रयोग (Major Experiment) (१ व २ ) पैकी कोणताही एक प्रयोग. (४ गुण)
B. उपप्रयोग (Minor Experiment) (१ व २ ) पैकी कोणताही एक प्रयोग. (३ गुण)
C. उपप्रयोग (Minor Experiment) (१ व २ ) पैकी कोणताही एक प्रयोग. (३ गुण)
D. Spotting Experiment (A to J) :
A to F पैकी कोणतेही दोन आणि G to J पैकी कोणतेही दोन असे एकूण चार spots.
प्रत्येक spotting ला २.५ गुण. (१० गुण)

From A to F any two and G to J any two. Total four spots. Each carrying weightage of 2 .5 marks.

E. प्रकल्प (Project) (५ गुण)
F. मौखिक परीक्षा (Viva voce) (२ गुण)
G. प्रयोग वही (Journal) (३ गुण)

एकूण : ३० गुण

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

परिशिष्ट – 'ब'

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा

## भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित व संख्याशास्त्र व इतर विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत

सर्वसाधारण सूचना ...

सन 2020-21 या शैक्षणिक वर्षात राज्यातील अनेक भागात विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात येऊ शकलेले नाहीत. त्यामुळे प्रात्यक्षिके घेता आलेली नाहीत. यापुढे उपलब्ध कालावधीत सर्व प्रात्यक्षिके पूर्ण करणे शक्य नाही. यावर खालील उपाय सुचविण्यात येत आहे.

खालील विषय निहाय आराखड्याप्रमाणे प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घ्यावीत व जर्नल प्रमाणित (certify) करावे. पूर्ण केलेल्या प्रात्यक्षिकांवर आधारित परीक्षा घ्यावी. प्रात्यक्षिकांची निवड संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक करतील व त्याची माहिती विद्यार्थ्यांना देतील. ज्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात यापूर्वीच विषय निहाय आराखड्यापेक्षा जास्त प्रात्यक्षिके पूर्ण केलेली आहेत, त्यांनी पूर्ण केलेल्या प्रात्यक्षिकांपैकी आराखड्यात सुचविल्यानुसार प्रात्यक्षिकांची परीक्षेसाठी निवड करावी. याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे. शाळेने निवडलेल्या व विद्यार्थ्यांनी अभ्यासलेल्या प्रात्यक्षिकांवरच परीक्षा घेण्यात यावी. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात असलेली परीक्षेबाबतची भीती कमी होईल.

PCMB या विषयांचे प्रात्यक्षिकांचे नियोजन खालील प्रमाणे आहे. प्रात्यक्षिक परीक्षा असणाऱ्या **इतर विषयांकरिता** विषयनिहाय आराखडा विचारात घेऊन **किमान पाच** प्रात्यक्षिके घ्यावीत व त्यावर आधारित आराखड्यानुसार परीक्षा घेण्यात यावी.

## १) गणित व संख्याशास्त्र (कला व शास्त्र ) (वाणिज्य )

**गणित व संख्याशास्त्र (कला व शास्त्र) (वाणिज्य)** या विषयांकरीता पाच प्रात्यक्षिके घ्यावीत. पाच प्रात्यक्षिकांची निवड करताना भाग १ व भाग २ च्या प्रत्येकी किमान दोन प्रात्यक्षिकांची निवड करावी. प्रश्नपत्रिकेच्या आराखड्यानुसार, घेतलेल्या पाच प्रात्यक्षिकातील भाग १ व भाग २ मधून प्रत्येकी दोन प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्याने या चार प्रश्नांपैकी तीन प्रश्न सोडवावेत. पाच गुण जर्नलला असतील.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी) परीक्षा एप्रिल-मे २०२१
## एन.एस.क्यू.एफ. समग्र शिक्षा अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा
## विषय (E2 ते E6, F3, F4 ,G3 ते G9 )

१) व्यवसाय शिक्षण अंतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रचलित पध्दतीने घेण्यात याव्यात.

| नियमित मुल्यांकन पध्दत | एप्रिल-मे २०२१ साठी मुल्यांकन पध्दत |
|---|---|
| • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये | • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये |
| • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>---------------<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>---------------<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे-<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>• ---------------<br>• अंतर्गत - २० गुण<br>---------------<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---------------<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण | • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>➢ प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुण<br>( २५ टक्के कमी केलेली प्रात्यक्षिके वगळून उरलेल्या प्रात्यक्षिकांपैकी किमान ६ प्रात्यक्षिकांचा सराव घेऊन त्यावर आधारित ३० गुणांचे एक प्रात्यक्षिक घेण्यात यावे.)<br>अंतर्गत गुण खालीलप्रमाणे:<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>---------------<br>अंतर्गत - २० गुण<br>---------------<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---------------<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण |

२) NSQF समग्र शिक्षा अंतर्गत मान्यताप्राप्त विषय (E2 ते E6, F3, F4 ,G3 ते G9 ) प्रात्यक्षिक परीक्षा एप्रिल-मे-२०२१ साठी शालेय स्तरावर अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती करण्यात यावी.

३) विद्यार्थ्यांने जमा केलेले टर्म वर्क , प्रकल्प,प्रात्याक्षिक तपासणी करून ते नोंदीसह शालेय दप्तरी जतन करून ठेवावे.

# ४) रसायनशास्त्र

**रसायनशास्त्र** विषयाकरिता एकूण प्रात्यक्षिकांपैकी खालील प्रमाणे पाच प्रात्याक्षिके पूर्ण करून त्यावर आधारित प्रयोग वही प्रमाणित (certify) करावी.

- दोन volumatric analysis प्रात्यक्षिकांपैकी एक प्रात्यक्षिक घेणे.
- Chemical Kinetics / Electrochemistry / Detection of two basic radicals या पैकी कोणतीही **दोन** प्रात्यक्षिके घेणे.
- Themochemistry / Detection of two acidic radicals / Preparation of one inorganic compound / Preparation of one organic compound या पैकी कोणतेही एक प्रात्यक्षिक घेणे.
- कोणतीही एक कृती (Activity) घेणे.

प्रश्नपत्रिकेच्या खालील आराखड्यानुसार परीक्षा घेण्यात यावी.

| | |
|---|---|
| प्रश्न १) a) प्रमाणित जर्नल (Certified Journal) | (५ गुण) |
| b) मौखिक परीक्षा (Viva voce) | (५ गुण) |
| प्रश्न २) Volumetric Analysis | (१० गुण) |
| प्रश्न ३ Chemical Kinetics / Electrochemistry/ Detection of two basic radicals | (१० गुण) |
| OR | |
| प्रश्न ३ a) Themochemistry / Detection of two acidic radicals / Preparation of one inorganic compound / Preparation of one organic compound | ( ६ गुण) |
| b) Activity | ( ४ गुण) |

एकूण : ३० गुण

४) प्रत्येक विद्यार्थीनिहाय टर्म वर्क ,प्रकल्प व प्रात्यक्षिक यांची तपासणी करून त्याचे गुणांच्या नोंदी मंडळाने पुरविलेल्या गुणपत्रिकेत (OMR SHEET) नोंदवून ते संबंधित विभागीय मंडळाकडे दिलेल्या वेळेत जमा करण्यात यावेत.

५) पुनर्परीक्षार्थींसाठी देखील निर्धारित विषयांच्या प्रात्यक्षिकाबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी. विषय - (E1 ते E4,E6 ते E9 F1 ते F5 )

६) व्यवसाय शिक्षण विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबतची उपरोक्त प्रमाणे कार्यवाही दिनांक २२/०५/२०२१ ते १०/०६/२०२१ या कालावधीत करण्यात यावी.

टीप: समग्र शिक्षा अंतर्गत NSQF व्यवसाय शिक्षण विषय (E2 ते E6, F3, F4 ,G3 ते G9 ) हे केंद्र सरकार पुरस्कृत असल्याने व या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा हे सेक्टर स्कील कौन्सिल मार्फत शाळांमध्ये घेण्यात येत असल्याने विशेष बाब म्हणून या विषयाचे प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येणार आहेत.

# लेंखी परीक्षेसाठी मार्गदर्शक सूचना (इ.१२वी)

१. एप्रिल-मे २०२१ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा **दि.२३/०४/२०२१ ते दि.२१/०५/२०२१** या कालावधीत प्रचलित पध्दतीने (ऑफलाईन) आयोजित करण्यात आलेली आहे.

२. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा अधिक कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. अशा प्रकरणी प्राचार्यांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था त्यांना परीक्षेपूर्वी माहित करुन दयावी. कोणताही विद्यार्थी या कारणास्तव परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (ऑफलाईन) जून महिन्यामध्ये आयोजित करण्यात येईल. विशेष परीक्षा ही मूळ परीक्षेचाच भाग राहील.

४. विशेष परीक्षा मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट मध्ये घेण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. सदर परीक्षा केंद्रे ही शहरी भागात ठराविक ठिकाणी व ग्रामीण भागात प्रामुख्याने तालुक्याच्या मुख्यालयात निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे या विशेष परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मंडळाने निर्धारित केलेल्या या परीक्षा केंद्रावर जाऊनच परीक्षा दयावी लागेल.

५. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहे. तद्नंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामूळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात येत असून त्यानुसार सुधारित अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

६. या जादा वेळेव्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.
(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळव्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

७. विशेष परीक्षा ही मूळ परीक्षेचाच भाग राहील. विशेष परीक्षेसाठी वेगळे शुल्क आकारले जाणार नाही. तसेच सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळामार्फत अलहिदा जाहीर करण्यात येईल आणि परीक्षेच्या वेळापत्रकात दोन विषयांमध्ये सार्वजनिक सुट्टी वगळता खंड ठेवण्यात येणार नाही.

८. अ. लेखी परीक्षेमध्ये प्रथमच प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेल्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा दयावी लागणार आहे. उदा. नियमित (Regular) विद्यार्थी, तुरळक (Isolated) विषय घेऊन प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, प्रथमच प्रविष्ठ होणारे खाजगी विद्यार्थी, आय.टी.आय. चे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे) Transfer of Credit साठी काही विषयांना प्रविष्ठ होणारे विद्यार्थी.

ब. लेखी परीक्षेस प्रविष्ठ होणारे पुनर्परीक्षार्थी, (Repeater) श्रेणीसुधार (Class Improvement Scheme) म्हणून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांना १०० टक्के अभ्यासक्रमानुसार परीक्षा दयावी लागेल.

९. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१०. इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहाण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान मोजण्यात येईल.

११. विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर म्हणजेच सकाळ सत्रात १०.०० वाजता आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न होईल असे पहावे. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

१२. परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझारची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर छोटी बाटली सोबत ठेवावी. तसेच स्वतःचा मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वतःसोबत आणणे आवश्यक राहील. परीक्षार्थी/विद्यार्थ्याने एकमेकांचे पेन, पेन्सिल, कंपास वापरु नये याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१३. एखादा विद्यार्थी कोविड-१९ विषाणूने बाधित झालेला असल्यास अशा विद्यार्थ्याची माहिती केंद्रसंचालकांना अगोदर देण्यात यावी. तसेच सदर विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेतली जाईल त्यासाठी तो प्रविष्ट होऊ शकतो यासंबंधी पालकांना कल्पना दयावी. त्यामुळे असे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही.

१४. परीक्षेदरम्यान एखादया परीक्षार्थ्यास कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने त्रास झाल्यास व त्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्याच्या संमतीने त्याची परीक्षा केंद्रात स्वंतत्र कक्षात बैठक व्यवस्था करण्यात येईल.

१५. कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खबरदारी म्हणून परीक्षा केंद्राजवळील सरकारी आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात येईल.

१६. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांमध्ये पुरेसे अंतर ठेवून बैठक व्यवस्था करण्यात येईल. शारिरीक अंतर राखले जाईल याची दक्षता घेण्याबाबत विद्यार्थी व पालक यांना सूचित करावे.

१७. प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा केंद्र/उपकेंद्रात प्रवेश करतांना व पेपर संपल्यावर बाहेर जातांना विद्यार्थ्यांनी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना दयाव्यात.

१८. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी/पालक यांना वारंवार येणाऱ्या शंकाची (FAQ) उत्तरे राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याबाबतची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून दयावी.

उपरोक्त सर्व सूचना शाळेच्या दर्शनी भागातील नोटीस बोर्डवर, शाळेच्या संकेतस्थळावर तसेच शाळेने तयार केलेल्या विद्यार्थी व पालकांच्या व्हॉटस् ॲप ग्रुपवर प्रसिध्द् कराव्यात.

------------ *** -------------

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा एप्रिल-मे २०२१

## मुख्याध्यापकांसाठी मार्गदर्शक सूचना

### प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प, इ.

१. अ) कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर इयत्ता १० वीची विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा मंडळाच्या प्रचलित पध्दतीने घेतली जाणार नाही. त्याऐवजी प्रात्यक्षिकांवर आधारित विशिष्ट लेखनकार्य (Assignments), प्रकल्प, प्रात्यक्षिक वही व गृहपाठ यांचा समावेश असेल. याचा विषयनिहाय तपशील **परिशिष्ट**-अ मध्ये देण्यात आलेला आहे. सदरचे प्रात्यक्षिकांवर आधारित कार्य लेखी परीक्षेनंतर दिनांक २१/०५/२०२१ ते दिनांक १०/०६/२०२१ या कालावधीत विद्यार्थ्यांकडून जमा करुन घेण्यात यावे.

प्रात्यक्षिक वही जमा करण्याच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यास कोविड-१९ विषाणूची लागण झाली असल्यास अथवा त्रास होत असल्यास प्रात्यक्षिक वही जमा करण्यास आणखी १५ दिवसापर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

ब) श्रेणी, तोंडी परीक्षा व इतर अंतर्गत मूल्यमापन इत्यादी घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना देण्यात येत आहे. यासाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक संबंधित माध्यमिक शाळांतूनच देण्यात यावे.

२.दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण/शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २१/०५/२०२१ ते दिनांक ०१/०६/२०२१ या कालावधीत आयोजित करण्यात याव्यात. कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर या कालावधीत **प्रात्यक्षिक** परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी दिनांक १०/०६/२०२१ पर्यंत वाढविण्यात यावा. दिव्यांगासाठी प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी प्रात्याक्षिकांवर आधारित विशेष लेखन कार्यादवारे मूल्यमापन करण्यात यावे. याबाबत संबंधित शाळेला स्वातंत्र्य देण्यात येत आहे.

३. शाळेत येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

४. उपरोक्त कालावधीत शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर छोटी बाटली सोबत ठेवण्याबाबत तसेच स्वतःचा मास्क व स्वतःचे लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुद्धा स्वतःसोबत आणावे व त्याचाच वापर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना सूचित करावे.

५. प्रात्यक्षिक वही शाळेमध्ये जमा करताना विद्यार्थी व अन्य संबंधित घटकांकडून गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन होईल असे पहावे. विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना त्यांचे तापमान घेऊन त्यांना टप्प्याटप्प्याने (बॅचेस पध्दतीने) प्रवेश देण्यात यावा. शाळेमध्ये प्रवेश करताना व शाळेतील संपूर्ण कालावधीत मास्क वापरणे विद्यार्थी व सर्व घटकांना अनिवार्य राहील.

६. विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांना वेळोवेळी सॅनिटायझरचा वापर करण्याबाबत सूचित करावे. शाळेमध्ये कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता शाळेने घ्यावी. प्रात्यक्षिक वही जमा केल्यानंतर विद्यार्थी त्वरित शाळेचे आवार सोडतील असे पहावे.

७. शाळेच्या आवारातील कचरा कुंडया झाकून ठेवाव्यात.

८. स्वच्छतागृह वेळोवेळी निर्जंतूकीकरण करुन घ्यावीत.

९. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षेच्या कालावधीत शाळेच्या आवारामध्ये पालकांना प्रवेश देऊ नये.

१०. प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षेच्या कालावधीत शाळेच्या आवाराबाहेर पालकांनी गर्दी करु नये यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी.

११. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी/पालक यांना वारंवार येणाऱ्या शंकाची (FAQ) उत्तरे राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याबाबतची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून दयावी.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

परिशिष्ट - 'अ'

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा

विज्ञान आणि तंत्रज्ञान, गणित व सामाजिक शास्त्रे- (इतिहास व राज्यशास्त्र, भूगोल )या विषयाच्या प्रात्यक्षिक किंवा तत्सम परीक्षेऐवजी निर्धारित विशेष लेखनकार्य (Assignment)

## १) विज्ञान आणि तंत्रज्ञान

- विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षा यावर्षी होणार नाही.
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी असलेले अंतर्गत २० गुण शालेय स्तरावर संबंधित विषय शिक्षक खालीलप्रमाणे देतील.

| | विज्ञान भाग १ | विज्ञान भाग २ |
|---|---|---|
| प्रकल्प | २ गुण | २ गुण |
| प्रात्यक्षिक वही | २ गुण | २ गुण |
| गृहपाठ | ६ गुण | ६ गुण |
| एकूण | १० गुण | १० गुण |

टीप:-१) **प्रकल्प:-** विज्ञान भाग १ आणि भाग २ साठी प्रत्येकी एका विषयावर प्रकल्प करावा. प्रकल्पाचा विषय पाठ्यपुस्तकावर आधारित असावा.

२) **प्रात्यक्षिक वही:** - बालभारतीने प्रकाशित केलेल्या प्रात्यक्षिक वहीतील विज्ञान भाग १ साठी किमान ५ प्रात्यक्षिके आणि विज्ञान भाग २ साठी किमान ५ प्रात्यक्षिके वहीत लिहून घ्यावीत.

३) **गृहपाठ** : - विज्ञान भाग १ आणि भाग २ साठी प्रत्येकी एक गृहपाठ लिहून घेणे. गृहपाठासाठी विषय निवडताना पाठ्यपुस्तक आणि प्रात्यक्षिक वही यातील विषयांचा अंतर्भाव असावा.

गृहपाठासाठी विषय निवडताना खालील उदाहरणांचा मार्गदर्शक म्हणून विचार करावा.

विज्ञान भाग १ :- १) रासायनिक अभिक्रियांचे प्रकार
२) प्रकाशाचे अपवर्तन -काचेच्या चिपेचा प्रयोग
३)प्रिझमच्या साहाय्याने होणारे प्रकाशाचे अपस्करण
४)बहिर्वक्र भिंगाचे नाभीय अंतर
५) होपचे उपकरण ( पाण्याचे असंगत आचरण)

विज्ञान भाग २ :- १) फुलाची रचना
२) सूत्री विभाजन, अर्धसूत्री विभाजन
३) मानवी प्रजनन संस्था
४) जैविक खते
५) प्राणी वर्गीकरण

शालेय स्तरावर विज्ञान शिक्षकांनी गृहपाठाच्या विषयाची निवड करावी.

* प्रकल्प, प्रात्यक्षिक वही आणि गृहपाठ लिखित स्वरुपात शाळेत जमा करून घ्यावे. शाळेने या नोंदी जतन करून ठेवाव्यात.

## २)गणित भाग १(बीजगणित) व भाग २(भूमिती)

| | | |
|---|---|---|
| लेखी परीक्षा- | गणित भाग १ (बीजगणित)- | ४०गुण |
| | गणित भाग २ (भूमिती) - | ४० गुण |
| अंतर्गत मूल्यमापन | | २० गुण |
| | एकूण गुण | १०० गुण |

अंतर्गत मूल्यमापनाच्या २० गुणांची विभागणी

| गृहपाठ | (MCQ) बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी - (प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी) |
|---|---|
| गृहपाठ- गणित भाग १ - ५ गुण<br>गृहपाठ- गणित भाग २ - ५ गुण<br>१० गुण | **(MCQ)** गणित भाग १ - ५ गुण<br>**(MCQ)** गणित भाग २ - ५ गुण<br>१० गुण |
| **टीप** - गणित भाग १ मधील कोणत्याही ५ कृती किंवा ५ मोठी उदाहरणे सोडवून घ्यावीत. त्यांना योग्य ते गुण देऊन त्याचे रुपांतर ५ गुणात करावे. त्याचप्रमाणे गणित भाग २ मधील ५ कृती किंवा<br>५ मोठी उदाहरणे सोडवून घ्यावीत व त्यांना दिलेल्या गुणांचे रुपांतर ५ गुणात करुन गृहपाठासाठी १० पैकी गुणांची नोंद करावी. | **टीप** - वगळलेल्या अभ्यासक्रमाचा विचार करुन गणित भाग १ व गणित भाग २ मधील घटकांवर प्रत्येकी १० गुणांचे १० बहुपर्यायी प्रश्न देऊन विद्यार्थ्यांची शाळेत चाचणी घेण्यात यावी किंवा घरी लेखन कार्य म्हणून सोडविण्यास देण्यात यावी. त्यात मिळालेल्या गुणांचे भाग १ साठी ५ गुणांमध्ये व भाग २ साठी ५ गुणांमध्ये रुपांतर करुन १० पैकी गुणांची नोंद करावी. |

**सूचनाः-** गृहपाठ व बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी यांच्या लेखी नोंदी जतन करुन ठेवाव्यात.

## ३) सामाजिक शास्त्रे भाग-१ (इतिहास व राज्यशास्त्र)

| | | |
|---|---|---|
| लेखी परीक्षा - | ४० गुण | (२८ गुण इतिहास+१२ गुण राज्यशास्त्र) |
| | १० गुण | (अंतर्गत मूल्यमापन) |
| | ५० गुण | |

अंतर्गत गुण - गृहपाठ - ०५ गुण
बहुपर्यायी चाचणी -०५ गुण

टीप :

* गृहपाठामध्ये वगळलेला अभ्यासक्रम (COVID 19 PANDAMIC परिस्थिती लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी)लक्षात घेऊन शालेय स्तरावर शिक्षकांनी गृहपाठाचे प्रश्न विकसित करावेत. गृहपाठ जमा करुन शालेय स्तरावर त्यांची तपासणी करुन ५ पैकी गुण गृहपाठासाठी द्यावेत.

* बहुपर्यायी चाचणी – प्रत्येकी चार पर्याय असलेले आठ वस्तुनिष्ठ प्रश्न इतिहासावर व दोन प्रश्न राज्यशास्त्रावर विचारावेत. या दहा गुणांचे रुपांतर पाच गुणांमध्ये करावे. ही बहुपर्यायी परीक्षा शाळेत किंवा गृहपाठ या स्वरुपात घेता येईल.

*अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य (गृहपाठ व बहुपर्यायी परीक्षा)शाळेत जमा करुन घेऊन शाळेने या नोंदी जतन कराव्यात.

## सामाजिक शास्त्रे भाग-२ (भूगोल )

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील आपत्कालीन परिस्थितीचा विचार करता इयत्ता १० वी भूगोल विषयाचे वार्षिक अंतर्गत मूल्यमापन पुढीलप्रमाणे करता येऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| १) **स्वाध्याय** | -०५ गुण | |
| २) **नकाशावर आधारित कृती किंवा आकृत्या /आलेख काढणे** | - ०५ गुण<br>एकूण १० गुण | (ही कृती घरी/वर्गात सोयीनुसार पाठ्यपुस्तक, नकाशासंग्रह इ. मदतीने पूर्ण करता येऊ शकेल.) |

वरील मूल्यमापन हे अंतर्गत मूल्यमापनाच्या आराखड्याशी सुसंगत घटकांनुसार आहे.

**सूचना-**

१) स्वाध्यायाबाबत-

स्वाध्यायावरील गृहपाठ देताना कोणत्याही एका घटकावर आधारीत एक प्रश्न देणे (उच्चस्तरीय बोधात्मक मुक्तोत्तरी प्रश्न असावा) तो विद्यार्थ्याने घरुन विश्वकोष, अंतर्जाल, मासिके इ. संपर्क साहित्याचा वापर करून सोडवावा.

२) नकाशा, आलेख व आकृत्या मिळून कोणत्याही ५ कृती पूर्ण केल्यास तेही ग्राह्य धरण्यात यावे. ( उदा. एखादा विद्यार्थी ५ नकाशे किंवा ५ आकृत्या किंवा ५ आलेख देइल, तर दुसरा एखादा विद्यार्थी २ नकाशे, २ आकृत्या व १ आलेख याप्रमाणे ५ कृती पूर्ण करु शकेल. याप्रमाणे कृतीमध्ये अदलाबदल करता येऊ शकेल.)

*अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य शाळेत जमा करुन घेऊन शाळेने या नोंदी जतन कराव्यात.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी) परीक्षा एप्रिल-मे २०२१**
**एन.एस.क्यू.एफ. समग्र शिक्षा अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा**
**विषय (एक्स-१ ते एक्स-८ व ९५ आणि ९७ )**

१) व्यवसाय शिक्षण अंतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रचलित पध्दतीने घेण्यात याव्यात.

| नियमित मुल्यांकन पध्दत | एप्रिल-मे २०२१ साठी मुल्यांकन पध्दत |
|---|---|
| • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये | • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये |
| • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>------------------------------<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>------------------------------<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे-<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>• ------------------------------<br>• अंतर्गत - २० गुण<br>------------------------------<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>------------------------------<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण | • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>➢ प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुण<br>( २५ टक्के कमी केलेली प्रात्यक्षिके वगळून उरलेल्या प्रात्यक्षिकांपैकी किमान ६ प्रात्यक्षिकांचा सराव घेऊन त्यावर आधारित ३० गुणांचे एक प्रात्यक्षिक घेण्यात यावे.)<br>अंतर्गत गुण खालीलप्रमाणे:<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>------------------------------<br>अंतर्गत - २० गुण<br>------------------------------<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>------------------------------<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण |

२) NSQF समग्र शिक्षा अंतर्गत मान्यताप्राप्त विषय (एक्स-१ ते एक्स-८ व ९५ आणि ९७ ) प्रात्यक्षिक परीक्षा एप्रिल-मे-२०२१ साठी शालेय स्तरावर अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती करण्यात यावी.

३) विद्यार्थ्यांने जमा केलेले टर्म वर्क , प्रकल्प,प्रात्याक्षिक तपासणी करून ते नोंदीसह शालेय दप्तरी जतन करून ठेवावे.

४) प्रत्येक विद्यार्थीनिहाय टर्म वर्क ,प्रकल्प व प्रात्यक्षिक यांची तपासणी करून त्यांचे गुणांच्या नोंदी मंडळाने पुरविलेल्या गुणपत्रिकेत (OMR SHEET) नोंदवून ते संबंधित विभागीय मंडळाकडे दिलेल्या वेळेत जमा करण्यात यावेत.

५) पुनर्परीक्षार्थीसाठी देखील निर्धारित विषयांच्या प्रात्यक्षिकाबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी. (विषय-८१ ते ९४)

६) व्यवसाय शिक्षण विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबतची उपरोक्त प्रमाणे कार्यवाही दिनांक २१/०५/२०२१ ते १०/०६/२०२१ या कालावधीत करण्यात यावी.

टीप: समग्र शिक्षा अंतर्गत NSQF व्यवसाय शिक्षण विषय (एक्स-१ ते एक्स-८ व ९५ आणि ९७ ) हे केंद्र सरकार पुरस्कृत असल्याने व या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा हे सेक्टर स्कील कौन्सिल मार्फत शाळांमध्ये घेण्यात येत असल्याने विशेष बाब म्हणून या विषयाचे प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी)परीक्षा एप्रिल-मे २०२१
एन.एस.क्यू.एफ. अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या (एक्स-१,९१,९२ व ९३)
प्रात्यक्षिकावर आधारीत विशेष लेखन कार्य

१) व्यवसाय शिक्षण अंतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रचलित पध्दतीने न घेता प्रात्यक्षिकावर आधारित विशेष लेखन कार्य स्वरुपात खालील प्रमाणे घेण्यात याव्यात.

| नियमित मुल्यांकन पध्दत | एप्रिल-मे २०२१ साठी मुल्यांकन पध्दत |
|---|---|
| • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये | • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये |
| • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>-----<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे-<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>• -----<br>• अंतर्गत - २० गुण<br>-----<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>-----<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण | प्रात्यक्षिक परीक्षा ऐवजी प्रात्यक्षिकावर आधारित विशेष लेखन कार्य - ५० गुण<br>➢ दिलेल्या प्रात्यक्षिकावर आधारित २ गृहपाठ - २० गुण<br>➢ प्रात्यक्षिकावर आधारित विशेष लेखन कार्य - ३० गुण<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>( २५ टक्के कमी केलेली प्रात्यक्षिके वगळून उरलेल्या प्रात्यक्षिकांपैकी किमान ६ प्रात्यक्षिकांचा सराव घेऊन त्यावर आधारित ३० गुणांचे बहुपर्यायी १५ प्रश्नांची प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर तयार करून विद्यार्थ्यांची शाळेत चाचणी घेण्यात यावी किंवा घरी लेखन कार्य म्हणून सोडविण्यास देण्यात यावी. प्रत्येक प्रश्नास २ गुण द्यावेत. )<br>अंतर्गत गुण खालीलप्रमाणे:<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>-----<br>अंतर्गत - २० गुण<br>-----<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>-----<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण |

२) NSQF व्यवसाय शिक्षण संचालनालया अंतर्गत मान्यताप्राप्त विषयांची (एक्स-१,९१,९२ व ९३) प्रात्यक्षिक परीक्षा एप्रिल-मे-२०२१ साठी शालेय स्तरावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षक नियुक्त करून घेण्यात यावी.

३) विद्यार्थ्यांने जमा केलेले टर्म वर्क , प्रकल्प ,गृहपाठ व प्रात्यक्षिक वर आधारित विशेष लेखन कार्य तपासणी करून ते नोंदीसह शालेय दप्तरी जतन करून ठेवावे.

४) प्रत्येक विद्यार्थीनिहाय टर्म वर्क , प्रकल्प ,गृहपाठ व प्रात्यक्षिक वर आधारित विशेष करून कार्य तपासणी करून त्याचे गुणांच्या नोंदी मंडळाने पुरविलेल्या गुणपत्रिकेत (OMR SHEET) नोंदवून ते संबंधित विभागीय मंडळाकडे दिलेल्या वेळेत जमा करण्यात यावेत.

५) पुनर्परीक्षार्थीसाठी देखील निर्धारित विषयांच्या प्रात्यक्षिकाबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी. (विषय-८१,९१,९२ व ९३)

६) बहुपर्यायी १५ प्रश्नांची ३० गुणांची प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर काढताना मंडळाच्या लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७) व्यवसाय शिक्षण विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबतची उपरोक्त प्रमाणे कार्यवाही दिनांक २१/०५/२०२१ ते १०/०६/२०२१ या कालावधीत करण्यात यावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा एप्रिल- मे २०२१

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेले गृहशास्त्र, शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्र व कार्यशिक्षण विषयांतर्गतचे ९ विषय यासाठी प्रात्यक्षिकांवर आधारीत विशेष लेखन कार्य

खालील विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीने न घेता प्रात्यक्षिकांवर आधारित विशेष लेखन कार्य स्वरूपात घेण्यात याव्यात.

| १ | **कार्यशिक्षण विषयांतर्गतचे**(१) घरगुती विद्युत उपकरणे (J-1), (२) दूध व दूधाचे पदार्थ (J-5), (३) हस्तभरत काम (J-9), (४) शिवण यंत्राव्दारे शिलाई (K-1), (५) टाकाऊ पासून सौंदर्याकृती (K-5), (६) पाककला (L-7), (७) भारतीय संगित (M-3), (८) चित्रकला व रंगकाम (M-6), (९) कागदकाम, पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी(M-7) हे विषय. |
|---|---|

| नियमित मूल्यांकन पध्दत | एप्रिल-मे २०२१ साठी मूल्यांकन पध्दत |
|---|---|
| लेखी परीक्षा प्रचलित पध्दती प्रमाणे २५ गुणांची राहिल. | लेखी परीक्षा प्रचलित पध्दती प्रमाणे २५ गुणांचे राहिल. |
| प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुण | २५ टक्के कमी केलेली प्रात्यक्षिके वगळून उरलेल्या प्रात्यक्षिकांपैकी किमान सहा प्रात्यक्षिकांचा सराव घ्यावा, त्यावर आधारित ५० गुणांचे बहुपर्यायी २५ प्रश्नांची प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर तयार करून विद्यार्थ्यांकडून शाळेत / घरी लेखन कार्य म्हणून सोडवून घ्यावी.<br>प्रत्येक प्रश्नास २ गुण द्यावेत. (५० गुण) |
| अंतर्गत गुण खालीलप्रमाणे<br>जर्नल वही + वर्षभरातील काम = २५ गुण<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत गुण = ७५ गुण<br>लेखी २५ गुण<br>+प्रात्यक्षिक ७५ गुण<br>= एकूण गुण - १०० | अंतर्गत गुण खालीलप्रमाणे<br>जर्नल वही + वर्षभरातील काम = २५ गुण<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत गुण = ७५ गुण<br>लेखी २५ गुण<br>+प्रात्यक्षिक ७५ गुण<br>= एकूण गुण - १०० |
| **२ गृहशास्त्र, शरीरशास्त्र** व **आरोग्यशास्त्र** | |
| लेखी परीक्षा प्रचलित पध्दती प्रमाणे ६० गुणांची राहिल. | लेखी परीक्षा प्रचलित पध्दती प्रमाणे ६० गुणांची राहिल. |
| प्रात्यक्षिक परीक्षा गुण = २० गुण<br>वार्षिक काम गुण = २० गुण | प्रात्यक्षिक परीक्षा गुण = २० गुण<br>वार्षिक काम गुण = २० गुण<br>२५ टक्के कमी केलेली प्रात्यक्षिके वगळून उरलेल्या प्रात्यक्षिकांपैकी किमान चार प्रात्यक्षिकांचा सराव घ्यावा, त्यावर आधारित २० गुणांचे बहुपर्यायी १० प्रश्नांची प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर तयार करून विद्यार्थ्यांकडून शाळेत / घरी लेखन कार्य म्हणून सोडवून घ्यावी. |

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त विषयांसाठी प्रात्यक्षिक परीक्षेएवजी विशेष लेखन कार्य दि.२१.०५.२०२१ ते दि.१०.०६.२०२१ या कालावधीत घेण्यात येऊन ते शाळेत जमा करून त्याचे मूल्यांकन करावे व ते जतन करुन ठेवावे.

# लेखी परीक्षेसाठी मार्गदर्शक सूचना (इ.१०वी)

१. एप्रिल–मे २०२१ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षा दिनांक २९/०४/२०२१ ते दिनांक २०/०५/२०२१ या कालावधीत प्रचलित पध्दतीने (ऑफलाईन) आयोजित करण्यात येत आहेत.

२. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शाळेतच घेण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा अधिक शाळा एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. अशा प्रकरणी मुख्याध्यापकाने आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था माहित करुन घ्यावी व ती विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी दयावी. कोणताही विद्यार्थी या कारणास्तव परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (ऑफलाईन) जून महिन्यामध्ये आयोजित करण्यात येईल. विशेष परीक्षा ही मूळ परीक्षेचाच भाग राहील.

४. विशेष परीक्षेसाठी वेगळे शुल्क आकारले जाणार नाही. तसेच सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळामार्फत यथावकाश जाहीर करण्यात येईल आणि या परीक्षेच्या वेळापत्रकात दोन विषयांमध्ये सार्वजनिक सुट्टी वगळता खंड ठेवण्यात येणार नाही.

५. विशेष परीक्षा मंडळामार्फत जुलै–ऑगस्ट मध्ये घेण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येतील. सदर परीक्षा केंद्रे ही शहरी भागात ठराविक ठिकाणी व ग्रामीण भागात प्रामुख्याने तालुक्याच्या मुख्यालयात निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे या विशेष परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मंडळाने निर्धारित केलेल्या या परीक्षा केंद्रावर जाऊनच परीक्षा दयावी लागेल याबाबत विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे.

६. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये कोविड–१९ विषाणूचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहे. तद्नंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामूळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात येत असून त्यानुसार सुधारित अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

७. या जादा वेळेव्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.
(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळव्यतिरिक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

८. अ. लेखी परीक्षेमध्ये प्रथमच प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेल्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा दयावी लागणार आहे. उदा. नियमित (Regular) विद्यार्थी, तुरळक (Isolated) विषय घेऊन प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, प्रथमच प्रविष्ठ होणारे खाजगी विद्यार्थी, आय.टी.आय. चे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे) Transfer of Credit साठी काही विषयांना प्रविष्ठ होणारे विद्यार्थी.

ब. लेखी परीक्षेस प्रविष्ठ होणारे पुनर्परीक्षार्थी, (Repeater) श्रेणीसुधार (Class Improvement Scheme) म्हणून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांना १०० टक्के अभ्यासक्रमानुसार परीक्षा दयावी लागेल.

९. शाळेत येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१०. इ.१०वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान मोजण्यात येईल.

११. विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर म्हणजेच सकाळ सत्रासाठी १०.०० वाजता आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न होईल असे पहावे. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

१२. परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझारची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यानी परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर छोटी बाटली सोबत ठेवावी. तसेच स्वतःचा मास्क व स्वतःचे लेखन साहित्य (उदा- पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वतःसोबत आणणे आवश्यक राहील. परीक्षार्थी/विद्यार्थ्याने एकमेकांचे पेन, पेन्सिल, कंपास वापरु नये याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१३. एखादा विद्यार्थी कोविड-१९ विषाणूने बाधित झालेला असल्यास अशा विद्यार्थ्याची माहिती केंद्रसंचालकांना अगोदर देण्यात यावी. तसेच सदर विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेतली जाईल त्यासाठी तो प्रविष्ट होऊ शकतो यासंबंधी पालकांना कल्पना दयावी. त्यामुळे असे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाहीत.

१४. परीक्षेदरम्यान एखादया परीक्षार्थ्यास कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने त्रास झाल्यास व त्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्याच्या संमतीने त्याची परीक्षा केंद्रात स्वंतत्र कक्षात बैठक व्यवस्था करण्यात येईल.

१५. कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खबरदारी म्हणून परीक्षा केंद्राजवळील सरकारी आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात येईल.

१६. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांमध्ये पुरेसे अंतर ठेवून बैठक व्यवस्था करण्यात येईल. शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घेण्याबाबत विद्यार्थी व पालक यांना सूचित करावे

१७. प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा केंद्र/उपकेंद्रात प्रवेश करतांना व पेपर संपल्यावर बाहेर जातांना विद्यार्थ्यांनी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना दयाव्यात.

१८. कोविड –१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण–तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी/पालक यांना वारंवार येणाऱ्या शंकाची (FAQ) उत्तरे राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याबाबतची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून दयावी.

उपरोक्त सर्व सूचना शाळेच्या दर्शनी भागातील नोटीस बोर्डवर, शाळेच्या संकेतस्थळावर तसेच शाळेने तयार केलेल्या विद्यार्थी व पालकांच्या व्हॉटस् ॲप ग्रुपवर प्रसिध्द् कराव्यात.

------------- ** ----------------